
ISBN-978-93-84593-96-4

Indian Council of Social Science Research (ICSSR) New Delhi
Sponsored National Seminar on

# Black Money and Its Impact on Indian Economy




Editor
Dr.Abasaheb Hange

ISBN-978-93-84593-96-4


| Sr. No. | Title of the Papers | Name of Authors | Page No. |
|---|---|---|---|
| 45 | भ्रष्टाचार रोखण्यामधील प्रसारमाध्समांची भूमीका आणि कार्य | रागानंद व्यवहारे | 143 |
| 46 | काळा पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेव होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 147 |
| 47 | काळा पैसा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हनूमंत भुमकर<br>कोकाटे जी.एस. | 150 |
| 48 | काळ्या पैशासंदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेची वास्तवीक परीस्थीती आणि परीणांमाचे विश्लेशन | डी.डी.गोसले | 153 |
| 49 | काळ्या पैशाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरीले परीणाम | बोडगे एस.जी. | 156 |
| 50 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचे झालेले परीणाम | मनिषा चौधरी | 158 |
| 51 | काळ्या पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 160 |
| 52 | काळ्या पैशाचे अर्थव्यवस्थेवरील परीणाम | के.एस.घोडके | 163 |
| 53 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या परीणाम | रामदास मुक्टे | 166 |
| 54 | काळ्या पैशामुळे भारतातील समाजावर होणारे परीणाम | राठोड सुभाष | 169 |
| 55 | काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था | साबळे एकनाथ | 172 |
| 56 | भारतीय अर्थव्यवस्था: निश्चलनीकरण आणि काळा पैसा | राम ताटे | 175 |
| 57 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचा परिणाम | सि.एस. वाकोडे<br>सि.एन. कोकाटे | 177 |
| 58 | काळा पैसा : भारतीय अर्थ व्यवस्थेवरील परिणाम | एस.जी.बिराजदार<br>एस.ए.सांगळे | 180 |
| 59 | भ्रष्टाचार : समाजाला लागलेली वाळवी | शिवाजी चौगुले | 1833 |
| 60 | भारतातील काळा पैसा : परिणाम व उपाय | शेळके सी.एस. | 186 |
| 61 | काळा पैसा एक सामाजिक समस्या | खेत्री एच.आर. | 190 |
| 62 | भारतातील काळा पैसा : कारणे, परिणाम व उपाय | डॉ. चव्हाण एम.एच. | 193 |
| 63 | भारतातील काळया पैशावर नियंत्रण : एकज्दृष्टोक्षेप | राम शेवलीकर | 198 |
| 64 | भारताचा काळा पैसा व भ्रष्टाचाराविरुध्दचा लढा | पोटे बी.टी | 200 |
| 65 | काळ्या व्यवहाराचे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील परिणाम. | दत्तात्रय नेटके | 204 |
| 66 | भारतीय अर्थव्यवस्था आणि काळा पैसा | देविदास नागरगोजे | 206 |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

ISBN-978-93-84593-96-4

काळा पैसा : भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

प्रा.डॉ.एस.जी.बिराजदार
वाणिज्य विभाग प्रमुख

प्रा.डॉ.एस.ए.सांगळे
अर्थशास्त्र विभाग
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर
ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद. ४१३६०३.

**प्रस्तावना :** -

पुरातन काळात भारतात सोन्याचा धूर निघत होता असे म्हटले जाते. पूर्वीच्या काळी सहकार समन्वय व प्रामाणिकपणा भारतीय जनतेत रूजलेला होता. बारा बलुतेदारी , वस्तु विनिमय पध्दती अस्तित्वात होती त्यामुळे स्वातंत्र्य पूर्व काळात काळा पैसा खूप कमी प्रमाणात निर्माण व्हायचा त्याकाळी लोकसंख्या ही कमी होती. पैशाचे मुल्यही त्यावेळी जास्त होते. स्वातंत्र्यानंतर लोकसंख्या वेगाने वाढत गेली . याचे विपरीत परिणाम वाढत गेले जसे की बेकारी, दारिद्रय , अर्थिक विषमता इत्यादी मध्ये ही वाढ होत गेली त्याचबरोबर काळा पैसाही वाढत गेला. भारताची आर्थिक तसेच औद्योगिक प्रगती वेगान होत गेली परंतू वाढत्या लोकसंख्येने ही प्रगती हा विकास खाऊन टाकला . भारत सरकारने वेळोवेळी अर्थिक विकासासाठी भरपूर प्रयत्नही केले आहेत. या विकासाबारोबराच काळा पैसाही वाढत गेला. परिणामी काळया पैशाची समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली .

**काळापैसा :-**

काळा पैसा किंवा ब्लॅक मनीची कोठेही व्याख्या दिसून येत नाही. परंतु आपण काळया पैशाची व्याख्या खालील प्रमाणे करू शकतो. सर्वसाधारणपणे शासनाचे विविध कर चुकवून जमा केलेला पैसा म्हणजे काळा पैसा होय . ( Black Money is the funds earned on Black market on which income tax and other taxes have not been paid. )

National Institute of public finance and policy:- Black Money is the aggregate of incomes which are taxable but not reported to an authorities.

पेपर संशोधनाचे उद्देश :- सदरिल पेपर संशोधनाचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

१) काळा पैसा निर्माण होण्याच्या कारणांचा शोध घेणे
२) काळया पैशाचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे
३) काळा पैसा कमी करण्यासाठी उपाय शोधणे

**संशोधन पध्दती : -**

या पेपर संशोधनासाठी द्वितीयक माहितीचा उपयोग केला असून विविध पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके व वेबसाईटसचा उपयोग केला आहे

**.काळा पैसा निर्मितीची कारणे -**

शासनाचे विविध कर जसे की उत्पन्न कर, उत्पादन कर , विक्री कर, संपत्ती कर, स्टॅंप ड्युटी चकवुन जमा केलेला पैसा म्हणजे काळा पैसा होय. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये काळा पैसा खालील मार्गानो निर्माण होतो.

**१) उत्पन्न कर चुकवून :-**

भारतातील शेती उत्पन्न सोडून इतर सर्व मार्गानी मिळवलेल्या वार्षिक उत्पन्नावर आय कर भरावा लागतो. ज्या व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न २ लाख पन्नास हजार च्या पुढे आहे त्या सर्वांना उत्पन्न कर भरावा लागतो. भारतात उत्पन्न कराचे दर खालील प्रमाणे आहेत.

| वार्षिक उत्पन्न | कर दर | कर |
|---|---|---|
| २,५०,००० | Nil | Nil |
| ५,००,००० | ५ % | १२५००/- |
| १०,००००० | २० % | १,१२५००/- |
| १०,००००० च्या वर | ३० % | ३० % दरान कर |



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

ISBN-978-93-84593-96-4

भारतातील नोकरदार वर्गाकडून उत्पन्न कर मोठ्या प्रमाणात भरला जातो. कारण त्यांचे वेतन देतानाच उत्पन्न कर कपात करून उर्वरित वेतन बँकेत जमा होते.

परंतु व्यापारी , उत्पादक , व्यवसायिक , धंदेवाईक यांच्याकडून उत्पन्न लपविले जाते. त्यांच्याकडून उत्पन्न कमी दाखवून उत्पन्न कर कमी भरला जातो. महात्मा गांधी म्हणतात की खरा भारत खेड्यात वसला आहे. खेड्याकडे चला. परंतु आज मात्र खेडेगावातील व्यापारी व दुकानदार यांचे कर शासन कार्यालयात नोंद नसत त्यामुळे त्यांच्याकडून व्यवसाय कर , उत्पन्न कर , विक्री कर भरला जातच नाही. तसेच खाजगी सावकारही मिळणा-या व्याजाचे उत्पन्न कमी दाखवून कमी उत्पन्न कर भरतात. आजही भारतातील अनेक खाजगी सावकारांची नोंद ही निबंधकाकडे नसते ते तर उत्पन्न कर भरतही नाही. नोंदणीकृत सावकार सुध्दा व्याजाची आकारणी ३८ टक्के दराने करून जमा खर्चाला केवळ १८ टक्के दर दाखवून व्याज भरलेली पावती दिल जाते. व अशा प्रकार जमा व्याजातूनही मुद्दल कमी दाखवून उत्पन्न कमी दाखविले जाते. व उत्पन्न दर कमी भरला जातो. अशा प्रकारे जे उत्पन्न दाखविले जात नाहीत. ते संपूर्ण काळा पैसा होय. डॉक्टर यांकडी तपासणी फिस मोठ्या प्रमाणावर घेऊन त्याची नोंद ठेवली जात नाही. त्यामुळे यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर काळा पैसा निर्माण होतो.

भारतात शेती उत्पन्नावर कर नाही. याचा फायदा घेण्यासाठी उत्पादक व्यापारी , व्यवसायिक तसेच नोकरदार शेती विकत घेतात व त्यांचे इतर मार्गाने मिळवलेले उत्पन्न शेती उत्पन्न दाखवून काळा पैसा पांढरा करतात. तसेच त्यावरील उत्पन्न करातही बचत करतात. शेती उत्पन्न नसतानाही शेत माल विकलेल्या पावत्या आडत व्यापा-याकडून कमीशन देऊन घेतल्या जातात. अशा प्रकारे हे व्यापारी व्यवसायिक काळा पैसा निर्माण करतात.

२)स्टँप ड्युटी चुकवून :- भारतातील शेत जमीन बंगले , प्लॉट , फ्लॅटस यांची खरेदी विक्री करतांना बाजार मुल्य कमी दाखवून म्हणजेच केवळ शासकीय मूल्य देवून घेतल्याचे दाखवून खरेदी विक्री होते. या खरेदी मुल्याच्या सात टक्के इतकी स्टँप ड्युटी भरावी लागते. सर्व साधारणपणे खरेदी खर्च हा मालमत्ता खरेदीदाराकडून भरला जातो . त्यामुळे मालमत्ता खरेदी करणारा ही खरेदी खर्च म्हणजेच स्टँप ड्युटी कमी भरावी या कारणास्तव शासकीय मूल्याच्या किमतीने खरेदी करून घेण्याचे मान्य करतो. परंतू प्रत्यक्षात या मालमत्तेची किंमत शासकीय मूल्याच्या पाच पटी पेक्षा ही जास्त असते. यातून खूप मोठ्या प्रमाणात काळा पैसा भारतात निर्माण होत आहे. उदा. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेत जमीनीचे बाजार मूल्य एका एकरचे किमान पाच लाख रू. आहे तर या शेतजमीनीचे शासकीय मूल्य केवळ एक लाख रूपये आहे. तर बागायत शेत जमीन एक एकरला १० लाख रू. पेक्षा जास्त असताना शासकीय मुल्य केवळ दोन लाख रूपये आहे.

त्यामुळे मालमत्तेची खरेदी विक्री ही शासकीय मुल्यानेच होते व उर्वरित रक्कम ही रोख स्वरूपात दिली जाते. यातून प्रचंड काळा पैसा निर्माण होत आहे.

३) लाचलुचपत : भारतातील सर्वच शासकीय तसेच इतर कार्यालयातून मोठ्या प्रमाणात लाच घेऊन कामे केले जातात. तहसील कार्यालय, रजिस्टरी ऑफिस , मंत्रालय, आरटीओ कार्यालय अशा सर्वच कार्यालयातून सर्रास लाच घेऊन कामे करून दिली जातात. यातूनही प्रचंड काळा पैसा निर्माण होत आहे. रजिस्टरी ऑफिसमध्ये तर सेवकाचीही दररोजची वर कमाई १ हजार रूपयापेक्षा कमी नसते. मग अधिका-यांची वर कमाई सांगायला नको. तसेच आरटीओ कार्यालयातही ड्रायव्हर परवाना, गाडयांचे पासिंग , गाडया भरलेला लोड यासारख्या अनेक कारणासाठी दलाल व अधिकारी यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर लाच घेतली जाते.

अशा प्रकारे जमा झालेला काळा पैसा आपल्या कुटुंबातील आई , वडिल, पत्नी, मुले , नातेवाईक यांच्या नावावर शेती बंगले प्लॉटस खरेदी केले जातात. सोने , चैनीच्या वस्तू, परदेश दौरे या काळया पैशातून होतात. भारतातील प्रचंड काळा पैसा परदेशात स्वीस बँकेत ठेवला गेला आहे.

**काळया पैशाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम:-**

भारतात निर्माण होणा-या प्रचंड काळया पैशाचे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असून समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. काळया पैशाचे परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) शासकीय कर संकलन कमी झाले असून शासनाला सततच्या महागाई मुळे पैसा कमी पडत आहे.

२) काळया पैशामुळे सतत भाव वाढीला चालना मिळते

३) काळया पैशामुळे आर्थिक विषमता वाढून गरीब अधिक गरीब होतात तर श्रीमंत अधिक श्रीमंत होतात.

४) काळया पैशाच्या गुंतवणकीवर विपरीत परिणाम होतो. सोने , चांदी ,हिरे , दागिने, प्लॉट या अनुत्पादक कार्यात गुंतवणूक वाढवून उद्योगासाठी गुंतवणुक कमी होते.

५) लाचखोरीत वाढ होवून पाहिजे ते काम करून घेतले जाते.

६) रियल इस्टेट किमतीत वाढ होते.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,

ISBN-978-93-84593-96-4

७) समाज विघातक कार्यात काळा पैसा वापरला जातो.

८) काळया पैशाचे परदेशात हस्तांतरण वाढते.

**काळा पैसा नियंत्रणाचे उपाय :-**

१) जीएसटी लागू केल्याने विक्री कर चोरीवर आळा बसत आहे.

२) उत्पन्न कर नियम कडक करणे

3) विदेशी विनिमय नियम कडक करणे

४) लाच खोरी वर नियंत्रण आणणे

५) रोख व्यवहारावर नियंत्रण आणणे

६) प्लॅस्टिक मनी (डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड , ऑनलाईन नेट बँकिंग ) वापर वाढवणे

७) कराचे दर कमी करणे

८) कर चुकवेगिरीवर नियंत्रण आणणे

**सारांश :-**

काळया पैशाचे अर्थव्यवस्थेवर होणारे विपरीत परिणाम थांबविणे अत्यंत गरजेचे असून याबाबत जनतेतूनच काळया पैशाला विरोध झाला पाहिजे. त्याशिवाय भारतातील काळा पैसा कमी होणार नाही. या करिता भारतीय जनतेची देश निष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जेणेकरून जनता बेकायदेशीर कामांना विरोध करेल.

संदर्भ : -

१)ललित मोहन अग्रवाल (२०१२), ब्लॅक मनी व व्हाईट पेपर

२) कविता राणी व डॉ.संजीव कुमार २०१४ , भारतातील काळा पैसा , भारतीय संशोधन जर्नल

३) सुकांता सरकार , २०१०, भारतातील समांतर अर्थ व्यवस्था , अर्थिक विकास जर्नल

४) www.google.com

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad